# <u>अधिसुचना</u>

भूसंपादन प्रकरण क्रमांक 75/2012-13 मौजे देऊळगांव मही ता.देऊळगांवराजा जि.बुलडाणा या खडकपूर्णा प्रकल्पासाठी डाव्या मुख्य कालव्यावरील नारायणखेड लघुकालवा क्र-1 चे कामासाठीच्या भूसंपादन प्रकरणामध्ये कास्तकांराचा विरोध असल्यामुळे कार्यकारी अभियंता खडकपूर्णा प्रकल्प विभाग देऊळगांवराजा यांनी सदर प्रकरणास 06 महिने मुदतवाढ देणेबाबत लेखी विनंती केल्यानुसार मा.जिल्हाधिकारी बुलडाणा हयांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक कावि/प्रअभूसं/कक्ष 7:2/कावि/ 1431/2018 दिनांक 17.05.2018 अन्वये असे आदेशित केले आहे की, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 च्या कलम 25 नुसार ज्या कालावधीत निवाडा देण्यात येईल तो कालावधी नेमुन दिला आहे. त्यात असलेल्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी कलम 19 अन्वये घोषणा केल्याच्या तारखेपासून 12 महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल. आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमिन संपादनाची संपुर्ण कार्यवाही रदद होईल.

परंतू त्याचे समर्थन करणारी परिस्थीती अस्तित्वात असेल तर समुचित शासनाला 12 महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढवण्याचा असा कोणताही निर्णय लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल. आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईट वर टाकण्यात येईल अशी तरतुद आहे.

त्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 यातील कलम 25 नुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक 75/2012-13 मौजे देऊळगांव मही ता.देऊळगांवराजा जि.बुलडाणा या प्रकरणात निवाडा देण्यात मा. जिल्हाधिकारी बुलडाणा हयांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक कावि/प्रअभूसं/कक्ष 7:2/कावि/ 4147-A/2018 दिनांक 15.11.2018 अन्वये पुनश्च: 06 महिण्याची मुदतवाढ देण्यात येत आहे. यापुढे या प्रकरणात मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही असे आदेशीत केलेले आहे.

करिता अधिसूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

( विवेक विठठल काळे)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, सिंदखेडराजा